उप आयुक्त
सामान्य प्रशासन विभाग
पुणे महानगरपालिका
ठराव क्र. आ/ ११६६
दिनांक:- ११/१२/२०२०

उप आयुक्त यांचे कार्यालय
सामान्य प्रशासन विभाग
पुणे महानगरपालिका
जावक क्र.उआसाप्र/ आ/९(१)/ ६२७४
दिनांक :- ११/१२/२०२०

## - आदेश -

विषय :-मलनि:सारण देखभाल व दुरुस्ती विभागाकडील घाणभत्ता देण्यात येतो अशा कनिष्ठ श्रेणीतील सेवक सेवानिवृत्त, मयत अथवा शारिरीकदृष्ट्या अपात्र ठरल्याने मनपा सेवेतुन मुक्त करण्यात आलेल्या सफाई सेवकाच्या वारसास वारस हक्क करार, मा.लाड/पागे कमिटीच्या शिफारशी नुसार व मे.राज्य शासनाचे दि. ३०/६/१९९४ चे निर्णयानुसार शेडयूलमान्य पदावर हंगामी नियुक्तीबाबत.

संदर्भ :- १.मा.उप आयुक्त(सा.प्र.)कार्या.ऐच्छिक सेवानिवृत्तीचे आज्ञापत्र क्र.उआ(सा.प्र.)/आस्था/९९४७, दि.३१/०३/२०२०..

२. मा.अति.महा.आयुक्त (ज.) ठराव क्र.१/३८१ दि.२७/१०/२०२०. .

३. शासन निर्णय क्रमांक चारित्र्य-२११७/प्रक्र -४८३/२०१७/१६-अ, मंत्रालय, मुंबई -३२, दि.२८/८/२०१७

१) पुणे मनपाच्या खात्यामध्ये ज्या सेवकांना घाण काम करावे लागते व त्याबाबत त्यांना घाण भत्ता देण्यात येतो अशा कनिष्ठ श्रेणीतील सेवक सेवानिवृत्त, मयत अथवा शारिरीकदृष्टया अपात्र ठरल्यास त्यांचे शेडयूलमान्य रिकाम्या जागेवर त्यांचे कुटुंबातील नेमणूक पात्र व्यक्तीस नेमण्यात यावे असे मनपा व मान्यता प्राप्त कामगार युनियन यांचेशी झालेल्या करारानुसार मनपावर बंधनकारक आहे.

२) त्यानुसार मलनि:सारण देखभाल व दुरुस्ती विभागाकडील खालील उमेदवाराची सफाईसेवक वेतन श्रेणी **४४४०-७४४०+ग्रेड पे १३००/-**+मान्य भत्ते+ घाण भत्ता + धुलाई भत्ता या हुद्दयाचे शेडयूलमान्य रिकाम्या जागेवर वारस करारानुसार नेमणूक करणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी संदर्भ क्र.२ च्या ठरावान्वये मान्यता दिली आहे.

| अ.क्र | उमेदवाराचे नांव व पत्ता | नेमणूक विभाग | तपशिल |
|---|---|---|---|
| 1. | **श्री. अक्षय वसंत शिंदे**<br>१९७ मंगळवार पेठ पुणे-११ | बिबवेवाडी क्षेत्रिय कार्यालय<br>हुद्दा:- **सफाईसेवक** | बिबवेवाडी क्षेत्रिय कार्यालय अंतर्गत मलनि:सारण देखभाल व दुरुस्ती विभागाकडील सफाईसेवक,श्री.वसंत कल्याण शिंदे दिनांक ३१/०३/२०२० रोजी ऐच्छिक सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांचे ऐच्छिक सेवानिवृत्तीने रिक्त झालेल्या जागी वारस करार व मा.लाड/पागे कमिटीच्या शिफारशी नुसार वारस - अविवाहीत मुलगा **श्री. अक्षय वसंत शिंदे** यांची सफाईसेवक या हुद्दयावर हंगामी नेमणूक मान्य. |



अधिकारी
...ना विभाग
पुणे महानगरपालिका

३)वरील वारस उमेदवाराची बिबवेवाडी क्षेत्रिय कार्यालयाकडील मलनि:सारण देखभाल व दुरुस्ती विभागाकडे शेडयूलमान्य सफाईसेवक या हुद्दयाच्या रिकाम्या जागेवर वर दर्शविलेल्या तपशिलाप्रमाणे आज्ञापत्राच्या दिनांकापासून अगर प्रत्यक्ष कामावर रूजू होतील त्या दिनांकापासून हंगामी नेमणूक करण्यात येत आहे.

सदर उमेदवारास सफाईसेवक या हुद्दयाची वे.श्रे.रू. **४४४०-७४४०+ग्रेड पे १३००/-**+मान्य भत्ते+ घाण भत्ता + धुलाई भत्ता देण्यात यावा.

महाराष्ट्र शासन निर्णय क्र. आनिओ १००५/१२६/सेवा-४, दि. २१ ऑक्टो.२००५ चे निर्णयानुसार सेवेत दि. १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणा-या कर्मचा-यांना निवृत्त वेतन योजने ऐवजी नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू करण्यात येईल. सध्या अस्तित्वात असलेले निवृत्ती वेतन योजना लागू राहणार नाही.

४) महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक : चारित्र्य-२११७/प्र.क्र.४८३/२०१७/१६-अ,दि.२८/०८/२०१७ अन्वये वारस उमेदवाराकडून सुधारित सांक्षांकित फार्म घेवून व चारित्र्य पडताळणी दाखला आज्ञापत्रकाचे दिनांकानंतर २ महिन्याचे आत सादर करण्याच्या अटीस राहून तात्पुरते आज्ञापत्र प्रसृत करण्याची तरतुद आहे तथापि सदर उमेदवाराचे चारित्र्य व पुर्व चारित्र्यबाबत खात्याने योग्य ती पुर्तता केल्याने सदर उमेदवारांकडून चारित्र्य पडताळणी दाखला दि.०४/०८/२०२० रोजी प्राप्त झाला आहे.

५) वरील नेमणूक पुर्णपणे हंगामी स्वरूपाची असून सेवाविनियम १०(अ) नुसार परिविक्षाधीन पध्दतीने करण्यात येत आहे. परिविक्षाधीनतेचा २ वर्षाचा कालावधी संपण्यापूर्वी २ महीने अगोदर सदर उमेदवारांची नेमणूक पुढे चालू ठेवणेविषयीचा अभिप्राय संबंधित मा.खातेप्रमुख यांनी आमच्याकडे पाठविणे आवश्यक आहे. वरिल उमेदवाराचे काम समाधानकारक न झाल्यास अगर कामावरील हजेरी अनियमित असल्यास तसेच दाखल केलेली माहिती व कागदपत्रे यामध्ये तफावत आढळून आल्यास वरील उमेदवारस कोणतीही पुर्वसूचना( नोटीस) न देता केव्हाही कोणत्याही वेळी मनपा सेवेतून कमी करण्यात येईल.

६) सदर उमेदवाराने नेमणूकीचे विभागात हजर होण्यापूर्वी जन्म दिनांकाबाबत पुराव्याची कागदपत्रे (जन्म-मृत्यु नोंदीतील उतारा/नसल्यास शाळा सोडल्याचा दाखला/शालांत परिक्षा प्रमाणपत्र) संबंधित प्रशासन अधिकारी यांना दाखवावीत व शारिरीक तपासणी करून घेणेसाठीचे पत्र या आज्ञापत्रकासोबत संबंधित वारसास मा.प्रशासन अधिकारी यांचे स्वाक्षरीने देणेत आले असून मा.आरोग्य अधिकारी यांचेकडून पूर्वनियोजित वेळेनुसार शारिरीक तपासणी करून घेवून शारिरीक पात्रतेचा दाखला प्राप्त करून घ्यावा. असा दाखला असल्याशिवाय या उमेदवारास संबंधित खाते प्रमुख यांनी कामावर हजर करून घेवू नये. त्याचप्रमाणे सेवापुस्तकात जन्म दाखल्याची एकदा नोंद झाल्यानंतर अशा कर्मचा-याची भविष्यात जन्म तारिख बदलण्याची विनंती मान्य करता येणार नाही. याबाबत स्पष्ट कल्पना संबंधित उमेदवारास देण्यात यावी. तद्नंतर याबाबत काही कायदेशीर प्रश्न निर्माण झाल्यास त्यांस संबंधित खाते जबाबदार राहील. जन्म तारखेचे, शैक्षणिक पात्रतेचे, जातीचे व इतर मूळ दाखले तपासून घेवून तशी खात्री करावी.

७) वरील उमेदवारांना मनपा सेवेचा राजीनामा देणे झाल्यास त्यांनी एक महिना लेखी पूर्वसुचना (नोटीस)देवून राजीनामा देणे आवश्यक आहे. पूर्वसुचना न देता राजीनामा दिल्यास एक महिना मुदतीपेक्षा राजीनाम्याची मुदत जितक्या दिवसांनी कमी असेल तितक्या दिवसांच्या पगाराची रक्कम (सर्व भत्त्या सह) पूर्वसुचना आवश्यक असलेल्या मुदतीच्या सर्व भत्त्यासह पगार त्यांचेकडून वसूल करण्यात येईल.

८) वरील उमेदवाराकडून हजर होतेवेळी नियमानुसार सेवाअनामत रक्कम भरून घेणे आवश्यक आहे.

९) शासन निर्णय क्र. सफाई २०१५/प्र.क्र.२६८/महामंडळे, मंत्रालय, मुंबई ३२. दि.११ मार्च २०१६ चे तरतुदीनुसार सफाई कर्माचारी म्हणून सेवानिवृत्त झालेल्या किंवा होणाऱ्या स्वेच्छानिवृत्ती घेणाऱ्या किंवा सेवेत असताना निधन पावलेल्या अनुसूचित जातीमधील इतर सफाई कर्मचाऱ्यांच्या वारस किंवा नातेवाईक यांस सदर योजनेचा लाभ देण्यात

यावा असे नमूद केले असल्याने वारस उमेदवाराने नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून ६(सहा) महिन्याच्या आत अजा गटातील जातीचा दाखला व जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

१०) वरील उमेदवार सदर आज्ञापत्रकाचे दिनांकापासून १ महिन्याचे आंत कामावर रूजू न झाल्यास त्याची नेमणूक रद्द समजण्यात येईल.

११) महाराष्ट्र शासन परिपत्रक जा.क्र. एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२, दि.१/०७/२००५ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन नियम-२००५ मधील प्रतिज्ञापत्राचा नमुना-अ या आज्ञापत्रका सोबत जोडला आहे. तो उमेदवाराने नेमणूकीच्या खात्याकडे रूजू होताना भरून देणे बंधनकारक आहे. त्याशिवाय उमेदवारास संबंधित खात्याने हजर करून घेवू नये.

१२) आज्ञापत्रकाच्या दिनांकापासून परिविक्षाधिनतेचा दोन वर्षाचा कालावधी संपण्यापूर्वी दोन महिने अगोदर वरील उमेदवाराची नेमणूक पुढे चालू ठेवण्याविषयीचा स्पष्ट अभिप्राय आमचेकडे पाठविणे आवश्यक आहे.

मा.प्रशासन अधिकारी यांनी सदर आज्ञापत्रकात नमूद केलेल्या बाबींची वरील उमेदवारास समज मिळाल्याबद्दल आज्ञापत्रकावर स्वाक्षरी घ्यावी व त्याप्रमाणे आमचे कार्यालयाकडे निवेदन सादर करावे.

**खात्याचे उप अधिक्षक** यांनी सदर सेवकाचे सेवापुस्तक भरून पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

कळावे.

(सुनिल इंदलकर)
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका

प्रत /-

१. मा.उप आयुक्त (सा.प्र.)
२. मा.मुख्य कामगार अधिकारी
३. मा.मुख्य लेखापाल व वित्त अधिकारी
४.मा.सहाय्यक आयुक्त, बिबवेवाडी क्षेत्रिय कार्यालय
५. **श्री. अक्षय वसंत शिंदे**

यांजकडेस माहितीसाठी व तजविजीसाठी ---

(प्रकाश मोहिते)
प्र.प्रशासन अधिकारी (आस्थापना)
पुणे महानगरपालिका

(पुणे महानगरपालिका)